# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : ९५२/२०२२

**तक्रारकर्ता,** श्री.प्रकाश लक्ष्मण जाधव,
मु.पो.ससाणे, ता.मुरबाड, जि.ठाणे
४२१ ४०१.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, शिक्षण आणि सेवा मंडळ मुरबाड
संचलित सौ.निर्मला बळीराम तोंडलीकर विद्यालय,
मु.पो.मुरबाड, ता.मुरबाड, जि.ठाणे ४२१४०१

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, शिक्षण आणि सेवा मंडळ मुरबाड
संचलित सौ.निर्मला बळीराम तोंडलीकर विद्यालय,
मु.पो.मुरबाड, ता.मुरबाड, जि.ठाणे ४२१४०१

**तक्रार सुनावणीचा दिनांक** : २६/८/२०२५

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १/९/२०२१ | ---- | १८/११/२०२१ | २१/१/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.११/३/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २६/८/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.जयवंत ढमके, शिक्षण आणि सेवा मंडळ मुरबाड संचलित सौ.निर्मला बळीराम तोंडलीकर विद्यालय ऑनलाइन उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" आपल्या संस्थेच्या तोंडलीकर विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे व वर्ग त्यांना मासिक/वार्षिक फी आकारण्यासंबंधी शिक्षक-पालक यांची झालेल्या सभेचे इतिवृत्तात प्रत मिळणेबाबत व इतर माहिती"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२१/१/२०२२ रोजी, *" जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक शिक्षण आणि सेवा मंडळ संस्थेच्या तोंडीलकर विद्यालय यांनी सात दिवसांत माहिती अपिलकर्त्यास मोफत देण्यात यावी. प्रतिनिधी यांनी सात दिवसांत अपिलकर्त्यास माहिती देण्याचे मान्य केले."* असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झाली नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.जयवंत ढमके यांनी निवेदन केले की, तक्रारकर्ता यांना माहिती उपलब्ध करून देऊ.

यावरून तक्रारकर्ता यांना माहिती प्राप्त झालेली नाही असे स्पष्ट होते.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

### आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिक्षण आणि सेवा मंडळ मुरबाड संचलित सौ.निर्मला बळीराम तोंडलीकर विद्यालय, मुरबाड यांनी तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती १५ दिवसात जलद टपालाने नि:शुल्क पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिक्षण आणि सेवा मंडळ मुरबाड संचलित सौ.निर्मला बळीराम तोंडलीकर विद्यालय, मुरबाड यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक १/९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपील आदेशानंतरही माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम

२००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१६/१०/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २६ ऑगस्ट, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिक्षण आणि सेवा मंडळ मुरबाड संचलित सौ.निर्मला बळीराम तोंडलीकर विद्यालय, मुरबाड - **यांना प्रत** --

-- शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद ठाणे, बी.जे.हायस्कूल,
टेंभी नाका, ठाणे (प) ४००६०१ **यांचेमार्फत रवाना.** (शिक्षणाधिकारी यांनी सदरची प्रत तात्काळ तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना बजावून पोहोच आयोगास सादर करावी)

## विवेचन

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.जयवंत किसन ढमके, सहायक शिक्षक आणि तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.राजु हरि रोकडे, मुख्याध्यापक, शिक्षण सेवा मंडळ संचलित सौ.निर्मला बळीराम तोंडलीकर विद्यालय मुरबाड उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोग आदेशाप्रमाणे माहिती दिली नाही व खुलासा सादर केला नाही. त्यांना खुलासा सादर करण्यासाठी एक शेवटची संधी देण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुढील तारखेस खुलासा सादर करावा.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. सदर प्रकरणी आयोगाने दि.२६/८/२०२५ रोजी आदेशित केल्यानुसार तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिक्षण आणि सेवा मंडळ मुरबाड संचलित सौ.निर्मला बळीराम तोंडलीकर विद्यालय, मुरबाड यांनी पुढील सुनावणीस लेखी खुलासा सादर करावा. त्यांना खुलासा सादर करण्यासाठी एक शेवटची संधी देण्यात येत आहे.

२. पुढील सुनावणीस तत्कालिन जन माहिती अधिकारी व विद्यमान जन माहिती अधिकारी, शिक्षण आणि सेवा मंडळ मुरबाड संचलित सौ.निर्मला बळीराम तोंडलीकर विद्यालय, मुरबाड यांनी सुनावणीस समक्ष उपस्थित रहावे.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.२४/११/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

राज्य माहिती आयोग
सत्यमेव जयते
महाराष्ट्र

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १६ ऑक्टोबर, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शिक्षण आणि सेवा मंडळ मुरबाड संचलित सौ.निर्मला बळीराम तोंडलीकर विद्यालय, मुरबाड - **यांना प्रत** --

-- शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद ठाणे,
रोड नं.२२, टोयटो सर्विस सेंटरच्या बाजुला, जीएसटी भवनसमोर,
वागळे इस्टेट, ठाणे (प) ४००६०१ **यांचेमार्फत रवाना.** (शिक्षणाधिकारी यांनी सदरची प्रत तात्काळ तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना बजावून पोहोच आयोगास सादर करावी)